bluebytes
news that matters

पुढारी

**Sunday, August 22, 2010**

**Smoke Free Mumbai' programme to taxi-rickshaw traveller**
Publication: Pudhari, Edition: Mumbai, Journalist: Bureau, Page No: 2, Location: Top-Center, Width(cms): 11, Height(cms): 14, Size(sq.cms): 154

# टॅक्सी-रिक्षा प्रवाशांसाठी 'स्मोक फ्री मुंबई' योजना

**प्रतिनिधी**

'स्मोक फ्री मुंबई' ही वाहतूक पोलिसांनी राबविलेली योजना आता टॅक्सी आणि रिक्षा प्रवाशांसाठी राबविण्यात येणार आहे. यापूर्वी अशी योजना वाहतूक पोलिसांनी हॉटेल्स आणि रेस्टॉरंटमध्ये राबविली होती. त्यामुळे मुंबईतील धूम्रपानाचे प्रमाणही कमी झाल्याचा वाहतूक पोलिसांनी दावा केला होता.



स्मोक फ्री मुंबईची योजना पालिकासह आरटीओच्या मदतीने राबविण्यात येत आहे. त्यासाठी वाहतूक पोलीस आयुक्तांनी तीन झोनल अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे. या योजनेच्या सुरुवातीला 'धूम्रपान करू नका' असे स्टीकर रिक्षा आणि टॅक्सीमध्ये लावली जाणार आहेत. त्यामुळे रिक्षा आणि टॅक्सीमध्ये बसणाऱ्या प्रवाशांमध्ये जनजागृती होईल आणि धूम्रपानाचे प्रमाण कमी होईल, असा दावा वाहतूक पोलिसांनी केला आहे.

या योजनेमध्ये रिक्षा आणि टॅक्सी युनियनलाही सोबत घेतले जाणार आहे. रिक्षा-टॅक्सीमध्ये बसणारे कितीतरी प्रवासी धूम्रपान करतात. त्यांना रोखण्यास मात्र वाहचालकांना अपयश येत आहे. शिवाय अशा प्रवाशांना विरोद दर्शविला तर सदर प्रवासी भाडे नाकारण्याची शक्यताही असल्याने वाहनचालक त्यांना धूम्रपान करण्यापासून रोखत नाहीत. याबाबत जनजागृती करण्यासाठी ऑगस्ट शेवटपर्यंत सुमारे २० हजार 'स्मोक फ्री' स्टिकर आरटीओ कार्यालयाकडून वाटली जाणार आहेत. रिक्षा-टॅक्सी युनियनकडेही तेवढीच स्टिकर देण्यात येणार आहेत. मात्र अशी स्टिकर वाहनात लावण्याचा आदेश आरटीओ कार्यालयाकडून दिला जाणार आहे. 'स्मोक फ्री मुंबई'ची जनजागृती करण्यासाठी सुमारे तीन लाख एसएमएसही पाठविण्यात आले आहेत. शिवाय येत्या दहिहंडी आणि गणेशोत्सव सणातही त्याबाबत जनजागृती करण्याचा पोलिसांचा विचार असल्याचे समजते.